# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

(भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 02, वर्ष Year 2025, दिनांक Date 08/02/2025

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988, कलमे Sections कलम-7
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ..., तारीख पासून Date from 16/10/24, वेळ Time 23·24, तारीख पर्यंत Date to 16/10/24, वेळ Time 23·41
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date 17/10/24, वेळ Time ...
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 32, तारीख Date 08/02/25, वेळ Time 17:00

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ..., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ...
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name हॉटेल कमर, डोंगरी, मुंबई, ठिकाणाचे नंबर No. if any ..., गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road ...
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka ..., जिल्हा Distt. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Distt. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name गणेश जवाहर गुप्ता (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name जवाहर गुप्ता
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age 30 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9167403722
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ... दिल्याचा दिनांक Date of Issue ... दिल्याचे ठिकाण Place of Issue ... (f) व्यवसाय Occupation आयसीआयसीआय कॅमिन एरिया एक्झिक्युटिव सुपरवायझर
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste तेली, जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता : Address : रूम न. 14, 3 माळा, कापडवाला बिल्डींग, चकल्या स्ट्रिट, मुंबई गल्ली / सर्वे नं. Ward ... घर / नाव नंबर House/Name No. ... फोन /मो. नंबर Phone/M. No. ... पॅन नं. Pan No. ... वोटर्स नं. Card No. ...
   रस्त्याचे नाव Road ... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ... गाव Village ... पोस्ट Post ... पो. स्टे. P. Stn. ...
   तालुका Taluka ... जिल्हा Distt. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   ज्ञानेश घेडगे पोलिस उपनिरीक्षक, डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री गणेश जवाहर गुप्ता, वय- 30 वर्षे रा. ठि- रूम नं- 14, 3 माळा, कापडवाला बिल्डींग, चकाला स्ट्रिट, मुंबई यांच्या संगणकावर टंकलिखित केलेल्या, सोबत जोडलेला जबाब हिच सदर गुन्ह्यातील प्रथम खबर समजण्यात येत आहे.

समक्ष,

(सही)

(रविंद्र लांभाते)
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई.

(सही)

जबाब	दि. ०८/०१/२०२५

श्री. गणेश जवाहर गुप्ता, वय–३० वर्षे, धंदा– खाजगी नोकरी, (आयटीसी कंपनीत एरिया एक्झिकेटीव सुपरवायझर ) रा.ठी.– रूम नं १४, ३ माळा, कापडवाला बिल्डींग, चकाला स्ट्रिट, मुंबई. ४००००३ मो.क्र. ९१६७४०३७२२.

---

मी वर नमुद पत्यावर जन्मापासुन माझे कुटुंबासह राहत आहे. मी ITC LTD १ ला माळा, मरकंटाईल चेंबर, अदी मुर्झबान पथ, बलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई येथील खाजगी कंपनीत मी एरिया एक्झिकेटीव सुपरवायझर म्हणुन नोकरी करत आहे. माझे सोबत माझी पत्नी, आई वडील, दोन भाउ यांचे सोबत रहात आहे. माझा मोठा भाउ नामे सागर साहु हा मोतीलाल ओसवाल कंपनीत नोकरीस आहे तसेच माझा लहान भाउ नामे गौतम गुप्ता, याचा पाणी पुरी चा धंदा आहे. माझी पत्नी व आई या गृहीणी आहेत. माझे वडील यापुर्वी पाणी पुरी चा धंदा करीत होते आता सहा महीन्यापासुन ते घरीच आहेत. माझे तसेच माझ्या भावाच्या मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

दिनांक १३/१०/२०२४ रोजीच्या मध्यरात्री माझे वडील नामे जवाहर बसंतू गुप्ता यांनी माझा लहान भाउ कु.गौतम गुप्ता हा घरी न आल्याने त्याला त्याच्या मोबाईल क्र. ८३६९००७८९६ वर कॉल केला असता सदर कॉल हा पोलीसांनी उचलला व "तुमचा मुलगा गौतम हा डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई येथे आहे तुम्ही डोंगरी पोलीस ठाणे येथे या" असे सांगितले. त्यांनतर दिनांक १४/१०/२०२४ रोजी सकाळी ९.३० वा सुमारास माझे वडीलांनी भेळ दुकानावर काम करणारा माझा मावस भाउ दिपक ईश्वरलाल गुप्ता यास डोंगरी पोलीस स्टेशन येथे चौकशीकामी जाण्यास सांगितले. तेव्हा पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर तो गुन्हेप्रतिबंधक कक्षातील सागर शिंदे नावाच्या व्यक्तीस भेटला. तेव्हा त्यांनी दिपकची तसे आमच्या पुर्ण कुटुंबाची पुर्ण चौकशी केली. त्यानंतर दिपक यांनी मला त्याच्या मोबाईल क्र. ७०४५२१९९९५ वरून सकाळी १०.०० वा सुमारास कॉल आला व त्याने मला सांगितले की, डोंगरी पोलीस स्टेशनला माझा लहान भाउ गौतम गुप्ता यास पोलीस घेवून गेले आहेत आणि तो पण डोंगरी पोलीस स्टेशन येथेच असल्याचे सांगितले. तेव्हा त्यांनी मला तेथील पोलीस अधिकारी श्री सागर शिंदे यांच्याशी बोलण्यास कॉल लावून दिला तेव्हा सागर शिंदे यांनी मला त्यांचा मो.क्र. **९३२६७०३३७०** हा दिला आणि त्यावर कॉल करण्यास सांगितले. त्यानंतर सागर शिंदे यांचा मो.क्र ९३२६७०३३७० यावर कॉल केला असता त्यांनी मला डोंगरी पोलीस ठाणे समोर दोन कॅबिन आहेत तेथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी डोगरी पोलीस ठाणे येथे सागर शिंदे यांनी भेटण्यासाठी दुपारी ३.३० वा सुमारास गेलो असता सागर शिंदे मला भेटले व त्यांनी मला सांगितले की "तुझा भाउ गौतम यास एनडीपीएस च्या गुन्हयात पकडले आहे. काय करायचे बोला, नाहीतर कमर्शियल केसमध्ये त्याला टाकू मग त्याचा जामीन होणार नाही. तो सात–आठ वर्षासाठी जेलमध्ये राहील". त्यानंतर सिव्हील ड्रेसवर असलेले अधिकारी ज्ञानेश येडगे हे तेथे आले. त्यांनी मला सांगीतले की, "तुझ्या भावाला बाहेर काढायचे असेल तर तीन लाख लागतील, नाहीतर कमर्शीयल केस मध्ये टाकुन त्याचा जामीन होणार नाही" असे सांगुन तो निघुन गेला. त्यानंतर सागर शिंदे या व्यक्तीने तीन लाख रुपयाचे कमी होणार नाही व मला अर्धा तासचा टाईम दिला. त्यानंतर मी बाहेर जावुन थोडया वेळाने अर्धा तासनंतर सागर शिंदे ला पुन्हा भेटलो. त्यावेळी मी त्यांना सांगीतले की, माझे नवीन लग्न झाले आहे व मी आताच सोनाराच कर्ज फेडले आहे. तेव्हा त्याने मला विचारले की, तुझ्याकडुन काय होवु शकते, त्यावर मी त्यांना सांगीतले की, माझ्याकडुन पंचवीस–तीस हजार मी करु शकतो. त्यावर त्यांनी मला दोन लाख सत्तर लाख हजार फायनल द्यावे लागतील असे सांगीतले. यावर सागर शिंदे यांनी मला सांगीतले की, "आज रात्री दोन लाख रुपये द्यावे लागतील, पन्नास हजार रुपये उद्या सकाळ पर्यंत दे व उरलेले वीस हजार रुपये दोन तीन महीन्यानी दे" असे सांगीतले. तेव्हा मी

समक्ष,
[signature]
( रविंद्र लांभाते )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

08/1/2025
[signature]
Ganesh Gupta

Scanned with OKEN Scanner

बाहेर जाउन कॉलवर माझे वडीलांना सगळी हकीकत सांगितली तेव्हा ते बोलेले की, "ऐवढे पैसे जमा करणे आपल्यांना शक्य होणार नाही त्यांना काय कारवाई करायची ती करू दया", तुम्ही घरी निघुन या. त्याप्रमाणे मी सागर शिंदे यांना सांगितले की आमच्याकडुन ऐवढे पैसे देणे शक्य होणार नाही तुम्हाला तुमची जी कारवाई करायची असेल ती तुम्ही करा. व नंतर तेथुन मी घरी निघुन गेलो.

दिनांक १५/१०/२०२४ रोजी मला सकाळी ११.०० वा सुमारास मला सागर शिंदे यांचा कॉल आला व तुम्ही पोलीस स्टेशनला येवून **सरांना (ज्ञानेश येडगे )** भेटा असे सांगितले. त्याप्रमाणे मी सागर शिंदे यांना भेटण्यासाठी मी व माझा मित्र अभिषेक अमरकुमार यादव यांच्यासह डोंगरी पोलीस ठाणे येथे गेलो असता ते तेथे मला सागर शिंदे न दिसल्याने मी त्यांना कॉल केला तेव्हा त्यांनी मला सांगितले की आम्ही तुमच्या भावाला घेवून तुमच्या घरी रूम नं १४, ३ माळा, कापडवाला बिल्डींग, चकाला स्ट्रिट, मुंबई आलो आहोत. तुम्ही पण इकडे या असे सांगितले त्याप्रमाणे मी व माझा मित्र अभिषेक अमरकुमार यादव रूम नं १४, ३ माळा, कापडवाला बिल्डींग, चकाला स्ट्रिट, मुंबई येथील घरी जाण्यासाठी निघालो असता अर्ध्या रस्त्यावर असतानाच परत मला सागर शिंदे यांचा कॉल आला व मला सांगितले की तुम्ही घरी येवू नका आम्ही परत पोलीस स्टेशनला येतोय तिकडेच भेटा. त्याप्रमाणे आम्ही परत डोंगरी पोलीस स्टेशनला येवून थांबलो त्यानंतर थोडया वेळाने सागर शिंदे त्यांच्या स्टाफ सह माझा भाउ गौतम गुप्ता यास घेवून डोंगरी पोलीस स्टेशनला आले. तेव्हा मी सागर शिंदे यांना जाउन भेटलो असता त्यांनी मला परत पैशांबाबत विचारणा केली व सांगितले की,. "तुम्हाला सरांनी तीन लाख सांगितले होते, त्यावरून आम्ही दोन लाख पन्नास हजार रूपये केले आहे, त्यातील रू १,०००,००/– आज रात्री पर्यंत दया, केस दाखल झाल्यावर रू १,०००,००/– व नंतर रू ५०,०००/– तुमच्या सवडीने दया". असे बोलुन रात्रीपर्यंत पैशाची व्यवस्था करा असे सागर शिंदे यांनी आम्हांस सांगितले. त्यानंतर मी माझा मित्र अभिषेक अमरकुमार यादव याच्यासोबत त्याच्या माझगांव येथील घरी निघुन गेलो. नंतर परत सायंकाळी ८.०० वा सुमारास सागर शिंदे यांचा मला व्हॉटस अप कॉल आला, परंतु सदर कॉल मी न उचलता त्यांना साधा कॉल केला तेव्हा सागर शिंदे मला बोलले की, पैशाच काय झाल तेव्हा मी त्यांना सांगितले की, मी अजुन ऑफिस मध्येच आहे, मी तुम्हाला उदया येवून भेटतो असे सांगितले.

दिनांक १६/१०/२०२४ रोजी दुपारी २.०० वा. सुमारास मी सागर शिंदे यांना भेटण्यासाठी डोंगरी पोलीस ठाणे येथे गेलो तेव्हा सागर शिंदे यांना सांगितले की, माझ्याकडुन तेवढया पैशाची व्यवस्था होत नाही, मी तुम्हाला ७५,०००/– देवू शकतोय, तेवढयात तेथे ज्ञानेश येडगे तेथे आले व ते बोलले की "आम्ही तीन लाखावरून दोन लाख पन्नास हजार वर आलोय तरी तुझ्याकडुन काही होत नाही" असे बोलुन सागर शिंदे यांना सांगितले की, तुम्ही कारवाई करून घ्या असे बोलुन मला बाहेर पाठविले. त्यानंतर थोडया वेळाने परत मला सागर शिंदे यांचा कॉल आला व रात्रीपर्यंत रू. १,०००,००/– आणुन दया. उदया आम्ही केस दाखल करणार आहोत. "तुम्ही पैसे आणुन दिले तर आम्ही त्याचे नाव कमर्शिअल केस मध्ये टाकणार नाही" असे सांगितले. परंतु सागर शिंदे व ज्ञानेश येडगे यांना मला **पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी व माझा मित्र अजय** सिंग यांच्यासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक १६/१०/२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वा सुमारास लेखी तक्रार देण्यासाठी आलो.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक रविंद्र लांभाते यांना मी वर नमुद केलेप्रमाणे लोकसेवक सागर शिंदे व ज्ञानेश येडगे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत व त्यावर कायदेशीर कारवाई करणेबाबत मी सही केलेली माझा स्वहस्ताक्षरातील लेखी तक्रार अर्ज सादर केला. सदर वेळी पोलीस निरीक्षक रविंद्र लांभाते यांनी पो.नि. गणेश सुर्यवंशी यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर त्यांनी त्यांच्या

समक्ष,

( रविंद्र लांभाते )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

08/01/2025

Gupta
Ganesh Gupta

Scanned with OKEN Scanner

कार्यालयात उपस्थित असलेले दोन इसमांची शासकीय पंच म्हणून ओळख करुन दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक लांभाते यांनी मी केलेल्या अर्जाबाबत पंचांना थोडक्यात हकिकत सांगून मी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोलीस निरीक्षक रविंद्र लांभाते यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोलीस निरीक्षक रविंद्र लांभाते यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवले. त्याचप्रमाणे मी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १६/१०/२०२४ रोजी पडताळणी करण्यात आली आहे.

त्यानंतर पो.नि. लांभाते यांनी आम्हा पंचांना ब्युरो कार्यालयातील पहिल्या माळयावरील गोपनिय कक्षात नेले. तेथे गेल्यानंतर आमची ओळख पडताळणी पथकातील पो.ह. मठपती यांचेशी करुन दिली व ते लोकसेवक यांच्या प्रत्यक्ष भेटी दरम्यान डी.व्ही.आर मशिनद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात येणाऱ्या संभाषणाचे ट्रान्सक्रीप्ट तयार करण्याकरीता मदत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर माझे व पंचाचे वक्तव्य झाल्यानंतर पो.नि. लांभाते, पंच व पडताळणी पथकासह आम्ही शासकीय वाहनाने लोकसेवक सागर शिंदे व ज्ञानेश येडगे यांच्या कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो तेव्हा **२२:१० वाजले होते.** त्यानंतर पो.नि.लांभाते यांनी सदरचे वाहन जे.जे. हॉस्पिटलच्या आवारात थांबविण्यास सांगुन तेथुन पंच अमोल जाधव हे माझे सोबत लोकसेवक यांच्या कार्यालयात जातील असे सांगितले. त्यानंतर पो.नि. लांभाते यांनी काही सुचना देवून माझे बनियनला व्हॉईसरेकॉर्डर लावुन ते सुरू करून आम्हांस लोकसेवक यांच्या भेटीकरीता रवाना केले. आम्ही डोंगरी पोलीस स्टेशन मुंबई येथे लोकसेवक यांच्या कार्यालयाजवळ गेलो असता लोकसेवक यांचे कार्यालय बंद असल्याचे दिसुन आल्याने माझा मोबाईल क्रमांक ९१६७४०३७२२ यावरुन लोकसेवक सागर शिंदे यांचे मो क्र ९३२६७०३३७० यावर कॉल करुन स्पिकर चालु करून लोकसेवक सागर शिंदे यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की तेथे तुझा भाउ दिपक हा तुम्हाला माझेकडे घेउन येईल असे सांगितले. त्यानंतर आम्ही शासकीय वाहनाजवळ परत आलो.

त्यानंतर पो.नि. लांभाते यांच्या आदेशाने पुढील कार्यवाहीकरीता शासकीय वाहन न्यु महेश्वरी उदयान डोंगरी मार्ग — सॅडहर्स्ट रेल्वे स्टेशन मार्ग वाडीबंदर ब्रिज वर थांबविण्यात आले. यानंतर पो.नि लांभाते यांनी आम्हास सांगितले की तक्रारदार यांचा भाउ दिपक यांनी सांगितलेल्या ठिकाणी हॉटेल कमर, डोंगरी परीसर येथे जावयाचे असुन लोकसेवक यांची भेट घेण्यापुर्वी पो.नि लांभाते यांनी व्हॉईसरेकॉर्डर सुरू करून लोकसेवक सागर शिंदे यांच्या भेट घेण्यासाठी हॉटेल कमर येथे रवाना केले. थोडयाच वेळात भाउ दिपक यांनी सांगितलेल्या ठिकाणी हॉटेल कमर येथे गेलो असता त्यावेळी हॉटेलच्या गेटजवळुन लोकसेवक सागर शिंदे यांच्या मोबाईल क्रमांक ९३२६७०३३७० यावर कॉल केला परंतु लोकसेवक सागर शिंदे यांनी कॉल उचलला नाही. तेवढयात दुसरे लोकसेवक नामे ज्ञानेश येडगे हे हॉटेलच्या गेट जवळ येउन आम्हांस १ल्या माळयावरील पॅसेज मध्ये घेउन गेले. लोकसेवक ज्ञानेश येडगे यांनी '' दिपक किधर है...दिपक किधर है त्याला बोलव ना जेवायला...असे मला बोलले तेव्हा मी त्यांना बोललो की मी दिपक ला सॅन्डहर्स्ट रोड स्टेशनला पैशाच्या ..ॲडजेस्टमेन्ट साठी पाठविले आहे. सगळे नाही झाले सर...ऑफीस होत सर माझ...मी आज...आता विक ॲन्ड..विक टू च क्जोजिंग होत सर आमच...असे लोकसेवक ज्ञानेश येडगे यांस मी सांगितले. त्यावर लोकसेवक ज्ञानेश येडगे यांनी ' काय तू नाही आणले सगळे तू... अर्धे त्यांच्याकडे दिले का... दिपक कडे...असे मला बोलले त्यावर मी त्यांना सांगितले की, 'दिपक कडे पंचविस हजार उदया घरातून घेवून येईल...तसेच माझा मित्र आहे बग...मानखुर्द वरुन निघाला आहे पन्नास हजार घेवून...पण मी काय म्हणतो सर...आज रात्री पर्यन्त जेवढ होईल तेवढ देतो सर... किती म्हणताय तुम्ही फायनल... . कोन नाय चौकीमध्ये...तिकडे गौतम नाय असे मी लोकसेवक ज्ञानेश येडगे यांना बोललो. यावर लोकसेवक यांनी सांगितले की, गौतम तिथ नाही आहे..... आझाद मैदानला ठेवलय ...रात्री

समक्ष,

(signature)

( रविंद्र लांभाते )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

08/01/2025

(signature) Ganesh Gupta

Scanned with OKEN Scanner

आपण तिकडेच ठेवतो.... बाहेरुन... तो जर सुटला ना...कि आपण आता त्याला व्यवस्थित करु आपण...त्यावर लोकसेवक असे मी लोकसेवक ज्ञानेश येडगे यांनी मला विचारले की, तु किती घेवून आलाय... ' त्यावर मी त्यांना सांगितले की माझा मित्र '...आता पंधरा विस मिनिटात तो सॅन्डस रोडला उतरेल तो... तुम्हाला आता... तुम्ही मला सांगा एक फायनल अमाऊन्ट सांगा ना सर... फायनल अमाऊन्ट...मग आज रात्रीच क्लोज करतो... त्यावर असे लोकसेवक ज्ञानेश येडगे मला बोलले की, **हा...एक लाख...एक लाख....** तेव्हा मी त्यांना सांगितले की, एक लाख नको ना सर...थोडस...एक लाख नाय होणार सर... रेंज तुम्ही खुप दिलय...एक...एक लाख नाही होणार सर... थोड कमी करा ना सर...' असे मी लोकसेवक ज्ञानेश येडगे यांना बोललो. त्यावर लोकसेवक ज्ञानेश येडगे हे **'एक सांगितले आहे मी दयायला... हू....कालच सांगितले होते मी त्याला... अरे यार अस नको करु... अरे तुझ घरासारख आहेस म्हणून कोऑपरेट केलेय मी... आता किती देतो....**असे मला बोलले यावर मी त्यांना ' आता तुम्ही सांगा ना...आता मी...मी तुम्हाला मॅक्स टू मॅक्स विस पंचविस मिनिटात तुम्हाला एक रक्कम देईल...पण तुम्ही सांगा जर अॅडजेस्टमेन्ट कस होईल सर ते.... तेच बोलतोय सर...मला... मला चांगल नाय वाटत आहे बोलन्याशी... किती...किती म्हटल...पन्नास हजार आहेत...' असे लोकसेवकाला ज्ञानेश येडगे यांना मी बोललो त्यावर लोकसेवक ज्ञानेश येडगे यांनी **' अरे यार तिन लाख तिन लाख** वरुन **डायरेक्ट एक लाख ला घेवून जातोय.. मला पण तुमच्याशी यार अस बार्गेनिंग करन चांगल नाय वाटत ना ते... तू....टेन्शन नको घेवू तू....टेन्शन नको...आपण आहे....तुझ्या भावाला आपण खुप कोऑपरेट करु...त्यातुन त्याला व्यवस्थित बाहेर काढू आपण...सेवन्टी कर.... कर पूर्ण तू फास्ट कर दूंगा...**असे मला बोलले. त्यावर मी त्यांना सांगितले की, ' मला लॉयरचा पण....लॉयरचा पण कॉस्ट असेल.... लॉयरचा पण कॉस्ट आहे ना सर मला.... सत्तर फायनल ना.... सत्तर हजार ना सर... थॅन्क्यु सर... पंधरा वीस मिनिटात मी तुम्हाला इथे देतो... इथे देवू...इथेच... डन...डन...असे मी लोकसेवक ज्ञानेश येडगे यांना बोललो त्यावर लोकसेवक ज्ञानेश येडगे मला बोलले की, हे ' कशाच्या लॉयरचा ....घेवून ये लगेच फास्ट कर... जा घेवून ये जा चल... हा जा...घेंवून ये... लगेच ये हा... इथेच ये वरती घेवून...असे बोलले. त्यानंतर मी आणि माझ्या सोबतचे पच श्री अमोल जाधव दोघे हॉटेल कमर वरून निघुन शासकीय वाहनाजवळ परत आलो. अशाप्रकारे झालेल्या संभाषणाचे थोडक्यात विवरण पो.नि. लांभाते आणि पो.नि. सुर्यवंशी यांना सांगितले.

त्यानंतर पो.नि. लांभाते यांनी त्वरीत मला रू ७००००/— लाचेच्या रक्कमेची व्यवस्था करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी मावस भाऊ दिपक ईश्वर गुप्ता यांचेकडुन घेतलेली रोख रक्कम रू ५०,०००/— पोनि लांभाते यांचे समक्ष हजर केली. त्यानंतर पो.नि. लांभाते यांनी सापळापूर्व कारवाई सुरू करीत असलेबाबत सांगितले व माझी अंगझडती घेण्यात आली. त्यानंतर पो.नि. लांभाते यांनी लाचेसाठी सदरच्या खऱ्या नोटा रक्कम रुपये ५०,०००/— (रूपये ५००/— दराच्या ९०, रूपये २००/— दराची १, रूपये १००/— दराची ४८ भारतीय चलनी नोटा,) नोटांना लावण्यात येणाऱ्या अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म व अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचे गुणधर्म आम्हांस समजावून सांगितले.

08|01|2025

Ggupta

Ganesh Gupta

समक्ष,

( रविंद्र लांभाते )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर पो.नि. लांभाते यांच्या सुचनेप्रमाणे पो.ह.चा चिंचोलकर यांनी कापसाच्या बोळयाने लाचेच्या रक्कमेतील सर्व नोटांना दोन्ही बाजूस अॅन्थ्रासीन पावडर लावली व सदरच्या चलनी नोटांना रबर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात काळजीपुर्वक अलगद ठेवल्या. त्यानंतर पो.नि. लांभाते यांनी मला व पंच अमोल जाधव सुचना देवून लोकसेवकांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी माझे उजवा हात डोक्यावरून फिरवून लोकसेवकाने लाच स्विकारल्या बाबत इशारा देण्याबाबतच्या, तसेच लाचेची रक्कम दिल्यानंतर मी माझे उजव्या हाताचा कोठेही स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी अशा सुचना दिल्या. व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो पोंह मठपती यांचे मदतीने चालू करुन तो माझे बनियनला आतील बाजुस लावून लोकसेवक यांच्या भेटीसाठी चालत रवाना झालो. थोडयाच वेळात आम्ही हॉटेल कमर, डोंगरी, मुंबई येथे गेल्यानंतर मी लोकसेवक सागर शिंदे यांना त्यांचे मो क्र ९३२६७०३३७० यावर कॉल करुन लाउडस्पिकर करून मोबाईलवर कॉल केला असता त्यांनी कॉल उचलला नाही व परत दुसरा लोकसेवक नामे ज्ञानेश येडगे यांचे मोबईल क्रमांक ८४२१६४१३५२ यावर देखील लाउडस्पिकर करून कॉल केला असता त्यांनी देखील कॉल उचलला नाही. त्यानंतर परत त्या दोन्ही नंबरवर कॉल केला असता सदर मोबाईल स्विच ऑफ लागले. त्यानंतर मी हॉटेलच्या रिसेप्शन वर चौकशी केली की पहिल्या माळयावर असलेले साहेब आहेत का? तेव्हा त्यांनी सांगितले की ते सगळे येथुन अर्धातासापुर्वीच निघुन गेले आहेत. त्यानंतर मी परत लोकसेवक यांच्या मोबाईल क्रमांकावर व्हॉटस अप कॉलींग केले असता ते देखील उचलले नाहीत. त्यानंतर आम्ही परत शासकीय वाहनाजवळ परत आलो. त्यावेळी पो.नि. लांभाते यांनी माझे बनियनला लावलेले डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून काढुन घेतले. त्यानंतर सदर हकीकत पो.नि. लांभाते व पो.नि. सुर्यवंशी यांना सांगितली. त्यानंतर आम्ही लाप्रवि कार्यालयात परत आलो.

त्यानंतर पो.नि. लांभाते यांनी मला सदरच्या रक्कमेस अॅन्थ्रासीन पावडर लावली असल्याने तसेच पुढील सापळा कारवाई लोकसेवक यांचा संपर्क झाल्यानंतर करण्यात येणार असल्याने सदरची रक्कम ही परत केली. तसेच पडताळणीच्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाई करीता वापरावयाची लाचेची रक्कम बदलून आणण्याच्या सुचना दिल्या.त्यानंतर पो.नि. लांभाते यांनी मला लोकसेवकांनी लाचेच्या संदर्भाने मोबाईल फोन वर संपर्क केल्यावर तात्काळ पो.नि. लांभाते यांना संपर्क साधण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर नमुद लोकसेवक यांना ला.प्र. वि. येथील कारवाई बाबत संशय आल्याने आजपर्यंत परत मला लोकसेवक ज्ञानेश येडगे व सागर शिंदे यांनी कॉल केला नाही तसेच मी देखील त्यांना परत कॉल केलेला नाही. सदर प्रकरणी सापळा कारवाई शक्य वाटत नसल्याने मी आज रोजी तक्रार देण्यासाठी आलो आहे.

**तरी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक ज्ञानेश येडगे डोंगरी पोलीस ठाणे मुंबई यांनी माझा भाउ गौतम गुप्ता यांस त्याचे नाव कमर्शिअल केस मध्ये न टाकण्यासाठी दि. १६/१०/२०२४ रोजी प्रत्यक्ष भेटीदरम्यान माझ्याकडे रू. ७०,०००/— लाचेची मागणी केली म्हणून लोकसेवक ज्ञानेश येडगे , डोंगरी पोलीस ठाणे,मुंबई यांच्याविरूध्द माझी कायदेशीर तक्रार असून कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.**

माझी वरील फिर्याद माझे सांगण्याप्रमाणे लॅपटॉपवर मराठीत टंकलिखीत केली असून, प्रिंटरद्वारे त्याची प्रिंट काढुन ती मी वाचुन पाहिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

08/01/2025

Ganesh Gupta

समक्ष,

( रविंद्र लांभाते )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ......................................................

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील फिर्यादी यांचा भाऊ गौतम गुप्ता यांस त्याचे नाव कमर्शिअल केसमध्ये न टाकण्यासाठी दि. 16/10/2024 रोजी 23:25 वा ते 23:50 वा चे सुमारास कमर हॉटेल डोंगरी, मुंबई येथे लोकसेवक पोलीस उपनिरिक्षक ज्ञानेश येडगे डोंगरी पो.ठाणे यांनी फिर्यादीस प्रत्यक्ष भेटी दरम्यान पंचासमक्ष फिर्यादीकडे रु. 50,000/- लाचेची मागणी केली आहे, म्हणुन फिर्यादी दिलेल्या तक्रारीवरुन लोकसेवक पोलीस उपनिरिक्षक ज्ञानेश येडगे डोंगरी पो.स्टे. यांचे विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 कलम 7 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरिक्षक रविंद्र लांभाते

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......................, जिल्हा ......................, राज्य ......................,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. ..............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................................................. (3) Transferred to P.S ......................................,
District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ........ रविंद्र लांभाते
पदनाम Rank ........ पोलीस निरिक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ..........................
Posting
Code No. of I. O. ............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ....................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner